REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# नागपूर जिल्हयातील बँक ऑफ बडोदद्वारे स्वंयसहाय्यता महीला बचत गटातील शेतमजुरांचे आर्थिक अध्ययन

डॉ. घनश्याम बी. बगडे
सहयोगी प्राध्यापक,
अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, काटोल रोड नागपुर.

## सारांश

नागपूर जिल्ह्याची आर्थिक सामाजिक पार्वभुमी इतर जिल्ह्याच्या तुलनेत वेगळी आहे. त्या मुळे महिला बचत गटांची कार्यप्रणाली व त्यांच्या समोरील अळथळे यांचा नागपूर जिल्ह्याच्या पार्श्वभुमीवर अभ्यास करून त्याचा संशोधात्मक निष्कर्ष समोर मांडने खुप गरजेचे आहे.

महिला बचत गटांची आजची स्थिती व भविष्यातील संभावित धोरणात्मक वाटचाल या सर्वाचे शास्त्रीय पद्धतीने विवेचन करून एक दिशादर्शक अभ्यास सर्वांसमोर येणे गरजंचे असल्याने सदर विषयाची निवड महत्वाची ठरते.

## प्रस्तावना

दारिद्रय निर्मुलनासाठी अनेक उपाययोजना भारत सरकारने राबविल्या परंतु दारिद्रयात पाहिजे तेवढी घट झाली नाही. भारत सरकारने दारिद्रय निर्मुलनासाठी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम सुरू केला परंतु या उपायानेही दारिद्रय फारसे कमी झाले नाही. देशातील दारिद्रय दूर करुन नवीन सामजिक व आर्थिक क्रांती घडवून आणण्याचे सामर्थ्य महिला बचत गट चळवळीत आहे.

ग्रामीण भागातील महिला व बालविकासासाठी १९८२–८३ मध्य DWCRA (Development of Woman and Children in Rural Areas) हा कार्यक्रम ५० जिल्ह्यासाठी सुरू केला. या कार्यक्रमामध्ये ग्रामीण महिलांनी आर्थिक कार्यक्रमात भाग घ्यावा. बँकाबरोबर व्यवहार करावेत, संपत्ती खरेदी करावी आणि कर्ज घेऊन स्वयंरोजगार सुरू करावा यावर भर देण्यात आला परंतु या कार्यक्रमाला फारसे यश मिळाले नाही. या योजेव्यतिरीक्त 'स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवकांना प्रशिक्षण' (ट्रायसेम), 'ग्रामीण कारागीरांना सुधारित अवजारांचा संच वाटप' (सीट्रा) या योजनामध्ये कर्जे व अनुदाने दिली मात्र दारिद्रय दूर झाले नाही. या सर्व योजनात काटकसर व बचत या घटकाकडे संपूर्ण दुर्लक्ष झाले.



बांग्लादेशात गरिबीचे उच्चटन करण्यासाठी प्रा. डॉ. मोहम्मद युनूस हे

प्रयत्न करीत होत. अर्थशास्त्राचे सिद्धांत व ग्रामिण भागातील वास्तविक स्थिती व यांतील विसंगती जाणवू लागली छोटया रक्कमेचे कर्ज हे गरीब व्यक्तीच्या जीवनातील संघर्ष बदलवू शकत याचा अनुभव त्यांनी घेतला. त्यांनी बांबूपासून टोपल्या बनवणाऱ्या कारागिराच्या वस्तीत १० महिण्याचा बचत गट स्थापण केला मात्र त्यांना तारणशिवाय कर्ज मिळू शकले नाही तेव्हा प्रा. डॉ. मोहम्मद युनूस यांनी स्वतःच मदत केली तारणशिवाय कोणतीही बॅक कर्ज देऊ शकत नाही याची त्याना जाणीव झाली १९८२ मध्ये त्यांनी महिलांचे बचत गट स्थापण करण्यास सुरूवात केली व याच महिलांच्या सहकार्याने १९८३ साली बांग्लादेश ग्रामीण बॅकेचे स्थापणा केली या बॅकंतर्फे स्वंयसहाय्यता बचत गटाचे कार्य सुरू आहे जगातील सर्व राष्ट्रांनी बांग्लादेशाचा आदर्श घेवून स्वयंसहाय्यता महिला बचत गट निर्मितीचे कार्य हाती घेतले भारतही अशा स्वयंसहायत्ता बचत गटाच्या स्थापणेला चालना मिळाली.

बँक ऑफ बडोद्याच्या नागपूर जिल्हात २९ शाखा आहेत. नागपूर जिल्हात नागपूर शहरात १८ शाखा असून ग्रामीणमध्ये बेला, मौदा, कुही, धानला, ब्राम्हणी, पारशिवणी, रामटेक, सावनेर, सावरगाव, उमरेड आणि वाडी येथे बँकाच्या शाखा आहेत. बँक ऑफ बडोद्याची स्थापना १९०८ साली झाली आहे. या बँकेद्वारे कृषी विकास योजनांचा अभ्यास करणे, बँकेद्वारे शेतकरी याना दिलेला कर्ज व सोयी संपत्तीच्या आधारावर त्यांच्या स्थितीत झालेल्या बदलांचा संशांधन रित्या अभ्यास केला आहे.

बँक ऑफ बडोद्याची स्थापना बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड तिसरे यांनी २० जुलै १९०८ ला गुजरात राज्यात बडोदा येथे केली. या बँकेच्या अन्य १४ प्रमुख वाणिज्य बँकासोबत १९ जुलै १९६९ ला भारत सरकार द्वारा राष्ट्रीयकरण केल्या गेले.

गेल्या काही वर्षात महाराष्ट्रात महाराष्ट्र शासन व राष्ट्रीयीकृत बॅका तर्फे अनेक प्रकारच्या योजना मोठया प्रमाणात राबविण्यात येत आहे. नागपूर जिल्हात राष्ट्रीयीकृत बॅका अंतर्गत तालूका स्तरावर वेगवेगळया हंगामामध्ये वेगवेगळया योजना राबविल्या जातात.

राष्ट्रीयीकृत बॅका अंतर्गत तालुकास्तरावर ज्या योजना राबविण्यात येत आहे त्या योजनांचा शेतकऱ्यांना खुप मोठया प्रमाणात लाभ होत असल्यामुळे महाराष्ट्रात नागपूर जिल्हयामध्ये येणाऱ्या प्रत्येक तालुक्यातील उत्पन्नामध्ये मोठया प्रमाणात वाढ होतांना दितस आहे. त्यामुळे शासनाद्वारे त्यांची दखल घेवून उत्पादन वाढविण्यासाठी कृषी विद्यापीठातील तंज्ञानी ज्या योजना राबविण्यात येत आहे. त्यामध्ये संशोधन करून नवीन योजना अमलात आणून उत्पादनात सातत्याने वाढ घेत आहे. व त्या योजना शेतकऱ्यांमध्ये त्या योजना मोठया प्रमाणात लोकप्रिय होत आहे.

**सारणी १. बँक ऑफ बडोद द्वारे नागपूर जिल्हयातील स्वंयसहाय्यता महीला बचत गटामार्फत शेतमजुरांच्या राहणीमानात सुधारणा दर्शक सारणी.**

| सेवांची माहिती नाही | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| पुर्णता सहमत | १३० | २६ टक्के |
| सहमत | १८५ | ३७ टक्के |
| अनिश्चित | १०० | २० टक्के |
| टसहमत | ४० | ०८ टक्के |
| पुर्णता असहमत | ४५ | ९ टक्के |
| **एकुण** | ५०० | १००.०० |

उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकुण ५०० लाभार्थीपैकी १८५ लाभार्थी हे वरील मंताशी सहमत आहे व त्यांची टक्केवारी ३७ इतकी आहे. १३० लाभार्थी हे वरील मंताशी पुर्णता सहमत आहे व त्यांची टक्केवारी २६ इतकी आहे. १०० लाभार्थी हे वरील मंताशी अनिश्चित आहे व त्यांची टक्केवारी २० इतकी आहे. परंतु ४५ लाभार्थी हे वरील मंताशी असहमत आहे व त्यांची टक्केवारी ०८ इतकी आहे.

**सारणी २ बँक ऑफ बडोदद्वारे नागपूर जिल्हयातील स्वंयसहाय्यता महीला बचत गटामार्फत शेतमजुरांच्या राहणीमानात सुधारणा झाली. या विधान बाबत उत्तरदात्यांद्वारे प्रदान करण्यात आलेले सरासरी गुण**

| N | Mean | SD | SE | Min | Max |
|---|---|---|---|---|---|
| 500 | 3.6 | ±0.96 | 0.23 | 1 | 5 |
| N :- **संख्या**; Mean :- **मध्यमान**, SD :- **मानक विचलन**; SE :- **मानक तृटी**; Min :- **किमान**; Max :- **कमाल** | | | | | |

वरील सारणी प्रमाणे बँक ऑफ बडोदाद्वारे नागपूर जिल्हयातील स्वंयसहाय्यता महीला बचत गटामार्फत शेतमजुरांच्या राहणीमानात सुधारणा झाली. या विधानाला उत्तरदात्यांद्वारे सरासरी ३.६±०.९६ गुण प्रदान करण्यात आले. याचाच अर्थ असा की, बहुतांश उत्तरदाते या विधानासंबंधी अनिश्चित नाहीत म्हणजेच ते वरील विधानाशी सहमत आहेत.

या सारणीतील माहिती वरून बँक ऑफ बडोदाद्वारे नागपूर जिल्हयातील स्वंयसहाय्यता महीला बचत गटामार्फत शेतमजुरांच्या राहणीमानात सुधारणा झाली.

## निष्कर्ष,

बँक ऑफ बडोदाद्वारे नागपूर जिल्हयातील स्वंयसहाय्यता महीला बचत गटामार्फत शेतमजुरांच्या राहणीमानात सुधारणा झाली. नागपूर जिल्ह्यातील महत्वपूर्णपणे अधिक सदस्यांना बचत गटासंबंधी माहिती शेजाऱ्यांपासून प्राप्त झाली

असून. सार्थकरित्या अधिक सदस्य नोंदणीकृत बचत गटातील सदस्य आहेत. नागपूर जिल्ह्यातील बचत गट सदस्यांमध्ये अडचणींच्या वेळी आर्थिक मदत मिळते म्हणून बचत गटात सदस्यता घेणाऱ्या सदस्यांची संख्या अधिक आहे. तथापि शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याकरिता, बचत करण्याकरिता व मुलांच्या शिक्षणाकरिता बचत गटात सदस्यता घेणाऱ्या स्दस्यांची संख्या देखील लक्षणीय आहे.

## संदर्भ ग्रंथसूची

१) डॉ. आगलावे प्रदीप संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन,नागपूर १ जाने.२०००
२) डॉ.भांडारकर पु. ल. सामाजिक संशोधन पद्धती महाराष्ट्र विद्यापीठ ग्रथनिर्मीत मंडळ, नागपुर. तृतीय आवृत्ती १९८७
३) डॉ.संत दु. का. संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन पुणे द्वितीय आवृत्ती जुलै - १९८८
४) डॉ. नाडगोंडे गुरूनाथ सामाजिक संशोधन पद्धती फडके प्रकाशन कोल्हापूर द्वितीय आवृत्ती ऑक्टो.१९९९
५) डॉ. जरारे विजय एल. समाजिक शास्त्रीय संशोधन प्रणाली अद्वैत प्रकाशन,अकोला २२ ऑक्टो.२००४
६) प्रा. घाटोळे रा. ना. समाजशास्त्रीय संशोधन तत्वे आणि पद्धती मंगेश प्रकाशन, नागपूर पाचवी आवृत्ती १९९२
७) डॉ. बोरूडे रा. र. संशोधन पद्धतीशास्त्र पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन सप्टें.२००५